**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या बिगर आदिवासी कर्मचारी/अधिकारी यांना शासकीय सेवेत घेतल्यानंतर त्यांच्या सेवेत पडलेला खंड नियमीत करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
**दिनांक : १५/१२/२००५**

<u>पहा</u> :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५

२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक २७ मे २००२.

३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -२००४/ प्र.क्र ४५/०४/१६ब, दिनांक २४ जून, २००४,

४) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -२००२/ प्र.क्र ९३/०४/१६ब, दिनांक ३० जून, २००४,

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन अ.क्र.१ येथे नमूद दिनांक १५ जून १९९५ च्या शासननिर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गासाठी सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण विहीत करण्यात आले असून या **विशेष मागास प्रवर्गातील** ज्या व्यक्तींना दिनांक १५ जून १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये, अशा प्रकारचे संरक्षण दिलेले आहे. तसेच संदर्भाधीन अ.क्र.४ येथे नमूद केलेल्या दि.३०/६/२००४ च्या शासन निर्णयानुसार, **ज्या बिगर आदिवासींनी** अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दि.१५ जून, १९९५ च्या पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहे, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करण्यात येवू नये. तसेच त्यांना ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकात दाखविण्यात यावे व यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील व अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत. असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - ६३०
आवक नं.
17 JAN 2006

3332

३. दिनांक ३० जून २००४ च्या आदेशानुसार ज्या कर्मचारी / अधिका-यांची अनुसूचित जमातीच्या दाव्याच्या आधारावर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नियुक्ती किंवा पदोन्नती झाली आहे. तसेच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सदरील अधिकारी / कर्मचारी **विशेष मागास प्रवर्ग किंवा अन्य कोणत्याही मागास प्रवर्गातील प्रमाणपत्र** सादर करु शकले नाही थोडक्यात म्हणजे जे कर्मचारी खुल्या प्रवर्गातील ठरले त्यांना देखील सदर शासन निर्णयान्वये त्यांच्या नियुक्तीस व पदोन्नतीस संरक्षण प्राप्त झाले. तथापि, जे अधिकारी / कर्मचारी दि.१५/६/९५ च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करु शकले नव्हते परंतू त्यांची नियुक्ती दिनांक १५/६/१९९५ पूर्वीची असून देखील त्यांना त्यांच्या नियुक्तीस संरक्षण प्राप्त झाले नव्हते. अशा कर्मचा-यांना सेवेतून काढून टाकले होते. अशा काढून टाकण्यात आलेल्या कर्मचा-यांना दिनांक ३० जून २००४ च्या शासन निर्णयानुसार सेवेत पुन्हा घेतल्यानंतर त्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड कशाप्रकारे नियमित करावा याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

**दि.१५/६/९५ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून सेवेत संरक्षण प्राप्त होण्यासाठी विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करु न शकल्यामुळे ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या होत्या व त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना उपरोक्त दिनांक ३० जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवेतील खंड (दि.१५/६/९५ च्या शासन निर्णयानुसार सेवा समाप्त केल्याचा दिनांक व दिनांक ३० जुन, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा शासन सेवेत घेतल्याचा दिनांक) यामधील कालावधी असाधारण रजा म्हणून नियमित करण्यात यावा. सदरील सेवाखंडीत कालावधीत त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष काम केले नसल्याने वेतन व भत्ते अनुज्ञेय राहणार नाहे. तसेच सेवाखंडीत कालावधी हा निवृत्तीवेतन व इतर अनुषंगिक लाभासाठी देखील अनुज्ञे राहणार नाही.**

४. हे आदेश मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळ / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा अनुदानित शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी कार्यालयांच्या निदर्शनास आणावेत.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.२४२/०५/सेवा-८, दि.२६/५/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अशोक खोत)**
**अपर मुख्य सचिव(साविस),**
**महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक , लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* उप संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग नवीपेठ, पुणे , ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली ११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वंयरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,
* पत्राने